# Number of Research Papers in the Journals Notified on UGC CARE List
# 2020-21

ISSN 2231-673X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष १२ वे अंक १ ला
एप्रिल, मे, जून २०२१



## महामानव
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर
## अभिवादन विशेषांक

# अनुक्रमणिका - 03


| अ.क्र. | प्रकरण | |
|---|---|---|
| • | शुभेच्छा – प्रा. कार्तिक पाटील | 05 |
| • | शोध महानवाचा : संपादकीय – प्रा. प्रफुल एम राजुरवाडे | 07 |
| 1 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक वारसा – प्रा. प्रकाश उत्तमराव हनवते | 13 |
| 2 | भारतीय वर्ण व्यवस्था आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार डॉ. अतुल म. महाजन | 20 |
| 3 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कुटुंबनियोजनावरील विचार – प्रा. डॉ. महेंद्र गजधाने | 26 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे सामाजिक व आर्थिक विचार – प्रा. पितांबर विठोबाजी पिसे | 30 |
| 5 | डॉ. आंबेडकरांची सामाजिक चळवळ – डॉ. प्रा. दिपक महाजन | 35 |
| 6 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय कार्य – प्रा.डॉ.राजेंद्र गुलाबराव काकुस्ते | 43 |
| 7 | स्त्रि स्वातंत्र्याचा जाहीरनामा – हिंदू कोड बिल प्रा. डॉ. उषा खंडाळे | 49 |
| 8 | महिलांचे मुक्तीदाता . डॉ. बाबासाहेब आंबेडकर – डॉ. कैलास फुलमाळी | 54 |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक कार्य — प्रा. रामा गोरोबा कांबळे | 60 |
| 10 | स्त्री उत्थानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हिंदु कोड बिलाचे योगदान – प्रा.डॉ.नथ्थु सिताराम गिरडे | 63 |
| 11 | बाबासाहेबांचे स्त्रीमुक्तीचे विचार व कार्य प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर | 67 |
| 12 | महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री कल्याणासंबंधी विचार –प्रा. डॉ. सारीका चौधरी | 73 |
| 13 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण – डॉ. संदिप बाळकृष्ण सातव, प्रा. हुमेश्वर डी. आनंदे, प्रा. अरूण व्हि. पिसे | 78 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार- डॉ. राहुल गोपीचंद सनेर | 84 |
| 15 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आर्थिक विचारक्रांती – प्रा. राहुल मोरेश्वर लभाने | 88 |
| 16 | डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक .- डॉ.शशिकांत गोकुळ साबळे, | 96 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोन डॉ. प्रज्ञा एस. जुनघरे | 103 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समरसता तत्त्वातून निरोगी अर्थव्यवस्थे वरील परिणाम — एक विवेकशील दृष्टीकोन डॉ. हितेश मा. दडमल | 106 |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व लोकशाही – डॉ. संदिप बाळकृष्ण सातव, | 112 |
| 20 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिऊर्जेतुन साकारलेले कवी – मनोहरांचे चिंतनकाव्य संशोधक – तुळशीराम शंकर कांबळे | 118 |
| 21 | भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही तत्वज्ञान – प्रा. डॉ. राहुल यशवंतराव निकम . | 122 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राज्य समाजवादाची संकल्पना : एक चिकित्सक अवलोकन डॉ. किर्तीकर वाल्मिक भीमराव | 130 |
| 23 | [redacted] | 135 |
| 24 | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मांतर घोषणा: एक ऐतिहासिक अवलोकन - डॉ. सुर्यकांत महादेवराव कापशीकर, | 142 |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांतीचे ऐतिहासिक महत्व – प्रा. संतोष गोहकार | 151 |

VOLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)

# १४. नागपूर जिल्ह्यातील पाच तहसिलीतील फुटपाथवरील उपहारगृहातील श्रमिकांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचे अध्ययन

प्रा. विजय बाबराव [illegible]
संशोधनकर्ता, श्रीनिकेतन कला व वाणिज्य महाविद्यालय, रेशीमबाग, नागपूर.
प्राचार्य डॉ. बबदेव बी. लांजेवार
ॲड. विठ्ठलराव बनपूरकर मेमोरियल कला-वाणिज्य महाविद्यालय, पालेबारसा, जि. गडचिरोली.

**सारांश**

फुटपाथच्या कडेला असलेल्या उपहार गृहातील श्रमीक हे समाजाचाच एक भाग आहे व त्यांच्या समस्या या समाजाच्या समस्या देखील आहेत त्यांच्या समस्यांचे उचित निराकरण होण्याच्या दृष्टीकोनातून समाजाच्या सहभागाची नितांत आवश्यकता आहे. प्रस्तुत अध्ययनात सहेतुक नमूना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला व त्या अंतर्गत यादृच्छिक पद्धतीच्या उपयोगाने नागपूर जिल्ह्यातील उमरेड, भिवापूर, कुही, हिंगणा व कळमेश्वर या ५ तालुक्यातून प्रत्येकी ३० याप्रमाणे एकुण १५० उपहारगृह श्रमीकांची निवड करण्यात आली.

**प्रस्तावना**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या आर्थिक विकासाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. योजनारूपी सुकाणू आणि अंकरूपी होकायंत्र यांच्या साह्याने भारतीय राज्यकर्ते भारताची जीवननौका सुखरूप तीरावर पोहोचवण्याची धडपड करीत आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या ७२ वर्षाच्या या कालावधीत आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व संरक्षण विषयक अनेक घटना, घडामोडी झाल्या, प्रगतीसुद्धा झाली. परंतु विकासाचा जो वेग अपेक्षित होता तो साध्य झालेला नाही, हे मान्य करावेच लागेल. आपल्या पंचवार्षिक योजनांच्या अंतर्गत गरीबी लवकरात लवकर दूर करण्याचे ठरले होते. परंतु प्रत्यक्षात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दहा योजना राबवूनही देशातील श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब आणखी गरीब झालेले आहेत. यामध्ये दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणारे यांचा समावेश आहे. यामध्ये असंघटित क्षेत्रातील कामगार, शेतमजूर, व्यावसायिक मजूर आणि माथाडी, हमाल, कष्टकऱ्यांचा समावेश होतो. अजूनही त्यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे. कामगार कायद्याच्या संरक्षणापासून हा वर्ग अलीप्त असल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात संघटित औद्योगिक श्रमीकांच्या मनात धगधगणारा असंतोषाचा ज्वालामुखी शांत करण्यासाठी, श्रमीकांच्या शक्तिला योग्य वळण देण्यासाठी व योजनांच्या अंतर्गत आखण्यात आलेल्या विकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी कामगारांचे सहकार्य मिळविण्यासाठी भारत सरकारने जाणीवपूर्वक काही धोरणे अंमलात आणलीत. औद्योगिक कामगारांचे जीवन समृद्ध करण्यासाठीच काही निश्चित प्रयत्न केले. मजदूर संघटनेच्या बळावर संप, हरताळ इत्यादी मार्गांचा अवलंब करून औद्योगिक

ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - IX, Issue – II, March - August - 2021
Impact Factor 2019 - 6.601 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्राचार्य डॉ. जयदेव बी. लांजेवार

In Recognition of the Publication of the Paper Titled

नागपूर जिल्ह्यातील पाच तहसिलीतील फुटपाथवरील [illegible]
श्रमिकांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचे अध्य[illegible]

Editor : Vinay S. Hatole

Ajanta Prakashan, Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.) 431 00[illegible]
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877, ajanta6060@gmail.com, www.[illegible]

VOLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २४ | चंद्रपूर जिल्ह्यातील पाच तहसिलांतील फुटपाथवरील उपहारगृहातील श्रमिकांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचे अध्ययन<br>प्रा. विजय वानराव पाठक<br>प्राचार्य डॉ. जयदेव बी. लांजेवार | १२६-१३० |

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - IX Issue - II March - August - 2021

English / Marathi Part - I

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.601
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

| | | |
|---|---|---|
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सांसदीय लोकशाहीसंबधी विचार– प्रा. विठ्ठल चौधरी | 137 |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'नवयान'– येवला ते नागपूर– डॉ. श्रीनिवास सातभाई | 144 |
| 26 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय काय – प्रा.डॉ.राजेंद्र गुलाबराव काकुस्ते | 149 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फाळणीविषयक विचार – डॉ. तीर्थराज कापगते. | 155 |
| 28 | डॉ. बी.बार. आंबेडकरांच्या विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव' डॉ. आर.ए. फुलकर, प्रा.व्ही.पी. काटकर | 162 |
| 29 | डॉबाबासाहेबआंबेडकरांचेशेती व शेतकरी धोरण - प्रा.बालाजी रावसाहेब बोडके | 169 |
| 30 | आंबेडकरी चळवळ आणि दलित साहित्य - डॉ. मथुरा मेवाड | 173 |
| 31 | आंबेडकरी विचारांचा दलित साहित्यावरील प्रभाव - प्रा.डॉ. रामकिशन दहिफळे | '178 |
| 32 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार :- डॉ.अनमोल शेंडे | 184 |
| 33 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्यां वृत्तपत्रांची प्रासंगिकता एक चिकित्सक अध्ययन विकास गवई | 190 |
| 34 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वृत्तपत्रीय प्रपंच – डॉ. युवराज धबडगे | 197 |
| 35 | पत्रकारिता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर – डॉ. मोहन राजाराम कापगते | 205 |

UGC Care Listed JournalISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक

वर्ष १२ वे, अंक - पहिला एप्रिल ते जून २०२१

• संपादक •

डॉ. शिवाजी हुसे

• अतिथी संपादक •

प्रा. कार्तिक रा. पाटील प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे

• संपादक मंडळ •

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागूल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. संजय भालेराव
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. प्रकाश खेत्री
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने
डॉ. रामचंद्र झाडे

मुल्य : १७५ रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९४०४०००३९८



# डॉ.आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनकार्यातील साम्यस्थळे

प्रा.डॉ.विशाखा कायंदे

महाराष्ट्र हे क्रांतीकारक, समाजसुधारक आणि विचारवंत या सर्वांची परंपरा असलेले राज्य आहे. छत्रपती शिवरायांच्या काळापासून जसा पराक्रमाचा वारसा या महाराष्ट्राच्या मातीने सुरु ठेवला आहे. तसाच वैचारिक वारसाही जोपासला आहे. समाजाला दिशा देण्याच्या कार्यात महाराष्ट्रातील विचारवंतांचा फार मोठा वाटा आहे. त्यातीलच दोन व्यक्ती महाराष्ट्राच्या मातीत जन्माला आल्या. एक हिंदू धर्मातील दलित पण लढाऊ जमात असलेल्या महार कुळात जन्मलेली आणि संपूर्ण देशभर अस्पृश्य समाजात स्वाभिमानाची चेतना पेटविण्यासाठी अनेक वर्षांची अंधारपर्वाची नाळ तोडून स्वत्व जागविले ते ज्ञानतपस्वी, प्राध्यापक, संशोधक, अधिवक्ता, बॅरिस्टर भीमराव रामाजी आंबेडकर. तर दुसरी व्यक्ती हिंदू धर्मातील ब्राम्हण कुळात जन्मलेली आणि संपूर्ण देश ज्यांनी क्रांतिविचाराने भारुन टाकला, ते क्रांतीसूर्य, क्रांतिकारकांचे मुकुटमणी, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर!

या उभयतांनी हिंदू धर्मातच नाही, तर संपूर्ण देशभर व इतर राष्ट्रातही आपल्या हिमालयी कर्तृत्वाचा, जाज्वल्य राष्ट्रभक्तीचा ठसा जनमानसावर उमटविला. या दोन्ही नेत्यांनी आपल्या देशातील समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अपार कष्ट घेतले. त्यांची देशसेवा ही समाज सुधारणेच्या कार्यात ऐकमेकांना पुरक अशीच होती. सकृतदर्शनी समाजाला भिन्न व विरुद्ध टोकाची भासणारी ही दोन व्यक्तिमत्वे मात्र हिंदूस्थानवर अंतःकरणापासून प्रेम करणारी व अस्पृश्यांच्या व हिंदूस्थानच्या हितासाठी समर्पित जीवन जगत होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जीवनच वैविध्यपूर्ण घटनांनी व्यापलेले आहे. हे दोन्ही नेते स्वतः करिता जगलेच नाहीत. उभं आयुष्य ध्येयसिध्दी साठी एक साधन म्हणून वापरलं.

भारताच्या इतिहासात विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाला विशेष असे महत्त्व आहे. या काळात राष्ट्राच्या इतिहासात विविधांगी घटनांची मांदियाळीच पहायला मिळते. ज्यामध्ये विशेषतः राजकीय,सामाजिक,सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात घडणाऱ्या घटनांचे पडसाद परस्पर क्षेत्रात उमटलेले दिसतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर हे आपापल्या ठरलेल्या ध्येयाचे परमोच्च शिखर पादाक्रांत करणारे पण वेगवेगळ्या वाटेने मार्गक्रमण करणारे रोहक ठरले. जाज्वल्य राष्ट्रभक्ती हा दोघांचाही समान गुण होता. अर्थातच राष्ट्रविषयक दोघांचेही विचार तत्वज्ञान जवळजवळ एकच होते. दोघांनीही "सामर्थ्याची कधीही उपेक्षा होत नाही आणि दुर्बलांना उपेक्षेशिवाय दुसरे काहीही मिळत नाही म्हणून बलवत्तर तोच श्रेष्ठ ठरतो." हे तत्व राष्ट्राच्या व व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी महत्त्वाचे मानले होते.

**व्यक्तिमत्व जडणघडणीतील प्रेरणास्थाने:**